## <u>वादी यांचा शपथेवरील उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. चांदोरकर यांच्याकडून</u>

०१. माझे शिक्षण ४ थी पास इतके झाले आहे. मी सदरचा दावा सर्वे नंबर २/ब, हिस्सा नंबर २६, गट नंबर ७६५ या मिळकतीबद्दल दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नंबर २, हिस्सा नंबर २६/ब हा मुळ सर्वे नंबर २ पासुन तयार झालेला आहे. दावा मिळकतीसंदर्भातील सर्व कागद मी पाहिलेले आहेत. दावा मिळकत कोणत्या फेरफार नंबरने तयार झाली हे मला सांगता येणार नाही.

०२. माझ्या वडीलांचे पुर्ण नाव भागोजी रामजी सुतार उर्फ कदम असे आहे. आमच्या आडनावात कदम आहे, परंतु आम्ही सुतार समाजाचे आहोत. या दाव्यातील प्रतिवादी पार्वती कदम या मराठा समाजाच्या आहेत. (साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्या नाभीक समाजाच्या आहेत). मी व प्रतिवादी क्र.१ एकाच गावामध्ये राहतो.

०३. दस्त नंबर ५३६/१९८७ या खरेदीखताने माझ्या वडीलांनी दावा मिळकत खरेदी केली, ते खरेदीखत मी वाचलेले आहे. मी माझ्या वडीलांनी खरेदी केलेल्या वर नमुद मिळकतीबाबतच्या चतुःसीमा सांगु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद खरेदीखतामध्ये वडीलांनी खरेदी केलेल्या मिळकतीच्या चतुःसीमा लिहीलेल्या नाहीत. भागोजी रामजी सुतार यांना मी, काशीराम, विलास व बळीराम ही ४ मुले व १ मुलगी कमल असे आहेत. बळीराम हे मयत आहेत. त्यांना पत्नी जयश्री, मुलगा अमर व मुलगी तेजल आणि सोनल असे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात भाऊ विलास व्यतिरिक्त अन्य कोणासही सामील केलेले नाही.

०४. मला खरेदीखत व गहाणखत यामधील फरक समजतो. दावा मिळकत धोंडू लक्ष्मण कदम व गोविंद लक्ष्मण कदम यांच्या नावे होती हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत पुर्वी धोंडू लक्ष्मण कदम व गोविंद लक्ष्मण कदम यांच्या नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही एकटया धोंडू लक्ष्मण कदम याने ३००/– रुपये देवून बाबाजी गोविंद जाधव यांच्याकडून सोडवून घेतली असे दाखविण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.

प्रश्न – धोंडू लक्ष्मण कदम व गोविंद लक्ष्मण कदम यांनी त्यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत बाबाजी गोविंद जाधव यांच्याकडे गहाण ठेवली होती ?

उत्तर – होय.

०५. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही मिळकतीचा मालक होण्यासाठी खरेदीखत करावे लागते. बाबाजी गोविंद जाधव व धोंडू लक्ष्मण कदम यांच्यामध्ये दावा मिळकतीबाबत खरेदीखत झालेले नाही हे म्हणणे खरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, एखादी जमीन गहाण देताना गहाण देण्याचा करार होतो तसा ती जमीन सोडविताना देखील जमीन सोडविण्याचा करार किंवा पावती होते. बाबाजी गोविंद जाधव यांना धोंडू लक्ष्मण कदम यांनी ३००/– रुपये गहाणपोटी परत केली असे दाखविणारी धोंडू लक्ष्मण कदम यांच्या नावाची पावती माझ्याकडे नाही.

०६. गोविंद लक्ष्मण कदम यांना ५ मुले आहेत. त्यांची नावे विठोबा, तुकाराम, लक्ष्मण, कृष्णा व महादेव अशी आहेत. त्यापैकी ४ मुले मिलीट्रीमध्ये आहेत. महादेव गोविंद कदम यांची पत्नी म्हणजे प्रतिवादी क्र.१ होय. हे म्हणणे खरे आहे की, मी या दाव्यामध्ये गोविंद लक्ष्मण कदम यांच्या

वर नमुद इतर वारसांना प्रतिवादीपणात सामील केलेले नाही. धोंडू लक्ष्मण कदम व गोविंद लक्ष्मण कदम यांच्या कुटूंबाचा गोविंद लक्ष्मण कदम याच्या मृत्यूनंतर सर्व कारभार धोंडू लक्ष्मण कदम हेच पाहत होते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, धोंडू लक्ष्मण कदम हा दावा मिळकतीचा स्वतंत्रपणे मालक झाला हे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, धोंडू लक्ष्मण कदम हा प्रतिवादी क्र.१ च्या एकत्र कुटूंबाचा पुढारी म्हणुन काम पाहत होता.

०७. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यास ग्रामपंचाायत म्हणजेच प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्या बेकायदेशीर बांधकामाबाबत नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांचे सन १९६८–६९ पासुन परसुले गावात घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या घराची दुरुस्ती केलेली आहे. परंतु ती त्यांनी परवानगी घेवून केलेली आहे हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक २३/१२/२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या घराच्या दुरुस्ती बांधकामाबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीने मला दिनांक २४/१२/२०१३ रोजी मालकीचे कागदोपत्र हजर करण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हिने घराची केवळ दुरुस्ती केली त्यामुळे प्रतिवादी क्र.१ विरुध्द ग्रामपंचायतीने कोणतीही कारवाई केली नाही.

०८. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हिने जुने घर दुरुस्त करण्याचे भासवून खोडसाळपणे घर दुरुस्ती परवानगी मिळण्याकरिता ग्रामपंचायतीकडे अर्ज दिला हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हिने ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, ग्रामसेवक या सर्वांना

हाताशी धरुन संगनमत करुन विनापरवाना अनाधिकृतपणे बांधकाम केलेले आहे हे मी खोटे सांगतो. ग्रामपंचायत व पंचायत समिती या वेगवेगळया संस्था आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हिने ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, ग्रामसेवक या सर्वांना हाताशी धरुन संगनमत करुन विनापरवाना अनाधिकृतपणे बांधकाम केलेले आहे म्हणुन त्यांच्याविरुध्द पंचायत समिती, पोलादपूर अथवा पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली नाही.

प्रश्न – प्रतिवादी क्र.१ याने तुमच्या म्हणण्याप्रमाणे किती क्षेत्रामध्ये बेकायदेशीर बांधकाम केले हे तुम्हाला सांगता येईल काय ?

उत्तर – ४० फुट लांबी आणि ६० फुट रुंदी इतक्या क्षेत्राचे बेकायदेशीर बांधकाम प्रतिवादी यांनी केलेले आहे.

०९. वडीलांनी दावा मिळकतीचे खरेदीखत केल्याचे मला वडीलांनी ज्या वर्षी खरेदीखत केले त्याच वर्षी कळाले. धोंडू लक्ष्मण कदम यांना मी चांगल्या प्रकारे ओळखत होतो. दावा मिळकतीचे खरेदीखत धोंडू लक्ष्मण कदम यांनी वडीलांना करुन दिले असे माझे म्हणणे आहे, त्यावेळी ते ८४ वर्षाचे होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या खरेदीखताच्या वेळेस धोंडू लक्ष्मण कदम यांना कमी दिसत होते व त्यांची बौध्दीक आकलनशक्ती कमी झालेली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुर्वजांनी धोंडू लक्ष्मण कदम यांच्यावर गैरवाजवी प्रभाव टाकुन सदरचे खरेदीखत त्यांची फसवणुक करुन करुन घेतले.

१०. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत ही धोंडू लक्ष्मण कदम व गोविंद लक्ष्मण कदम यांची असल्यामुळे गोविंद लक्ष्मण कदम यांच्या कायदेशीर वारसांचा त्यामध्ये हिस्सा, अधिकार होता. हे म्हणणे खरे नाही

की, गोविंद लक्ष्मण कदम यांच्या वारसांना डावलुन माझ्या वडीलांनी दावा मिळकतीचे चुकीचे खरेदीखत करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी करुन घेतलेले खरेदीखत गोविंद लक्ष्मण कदम यांच्या वारसांवर बंधनकारक नाही व ते बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, धोंडू लक्ष्मण कदम यांना एकटयांना दावा मिळकत माझ्या वडीलांना विकण्याचा कायदेशीर अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, केवळ मला व विलासला दावा मिळकतीविषयी दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे घर आम्ही पाडून मागतो ते घर प्रतिवादी क्र.१ हिच्या नावे सन १९६८–६९ पासुन आहे व ती तेव्हापासुन त्या मिळकतीचा मालमत्ता कर ग्रामपंचायतीकडे भरते.

११. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, धोंडू लक्ष्मण कदम यांनी दावा मिळकत ०–३–९५ हे. आर. इतकी जमीन बिगरशेती करुन घेतली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी दावा मिळकतीचे खरेदीखत केले त्यावेळी मी हजर नव्हतो अथवा त्यास साक्षीदार नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.२ ग्रामसेवक/ग्रामपंचायत परसुले पुकारता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही. उलटतपास पुर्ण.**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत
सही/–
(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०७/१२/२०२२